Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। मंगळवार, दि. २ जून २०२६ । वर्ष १ । अंक ५८ । पाने २ । DIGITAL EDITION

राजमाता अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

(पान २ वर)



## महायुतीत धुसफूस; जागा भाजपच्या वाट्याला गेल्याने शिवसेना नाराज

# शिवसेनेची नाराजी भाजपला महाग पडणार?

## शिवसेनेच्या आमदारांची अनुपस्थिती; नगरसेविकेच्या बंडखोरीने राजकीय समीकरणे ढवळली

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव: जळगाव विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीतील अंतर्गत मतभेद आता उघडपणे समोर येऊ लागले आहेत. जळगावची जागा भाजपच्या वाट्याला गेल्यानंतर शिवसेनेतील नाराजी शिगेला पोहोचल्याचे चित्र दिसत असून, भाजप उमेदवाराचा उमेदवारी अर्ज दाखल करताना शिवसेनेच्या चार आमदारांसह प्रमुख पदाधिकाऱ्यांनी अनुपस्थित राहणे ही त्याचीच प्रचिती मानली जात आहे.**

शिवसेनेच्या एका नगरसेविकेसह दोन जणांनी बंडखोरीचा झेंडा उभारल्याने जळगावच्या राजकीय वातावरणात चांगलीच खळबळ उडाली आहे. महायुतीत जागावाटपाच्या वेळी शिवसेनेला जळगावची जागा मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, अंतिम क्षणी ही जागा भाजपच्या वाट्याला गेल्याने शिवसेनेत अस्वस्थता निर्माण झाली. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या महत्त्वाच्या कार्यक्रमाला शिवसेनेचे चार आमदार आणि अनेक प्रमुख पदाधिकारी अनुपस्थित राहिल्याने महायुतीतील नाराजीवर शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. दुसरीकडे, भाजपने उमेदवार बदलण्याचा घेतलेला निर्णयही पक्षांतर्गत चर्चेचा विषय ठरला आहे. सुरुवातीला डॉ. केतकी पाटील यांचे नाव जवळपास निश्चित मानले जात होते. मात्र, अखेरच्या टप्प्यात नंदकिशोर महाजन यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या बदलामागे पक्षातील ज्येष्ठ आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांचा दबाव कारणीभूत ठरल्याचे बोलले जात आहे. डॉ. केतकी पाटील यांनी अल्पावधीत भाजपमध्ये प्रवेश केला असला तरी त्यांना थेट आमदारकीची संधी देण्याबाबत जुन्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजी होती. पक्षासाठी दीर्घकाळ काम करणाऱ्या नेत्यांनी संघटनात्मक योगदानाचा मुद्दा वरिष्ठ नेतृत्वापर्यंत पोहोचवला. परिणामी, गुर्जर समाजाचे प्रतिनिधित्व आणि पक्षातील दीर्घकालीन योगदान या आधारावर नंदकिशोर महाजन यांना उमेदवारी देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

- * भाजप उमेदवारीवरून अंतर्गत खदखद
- * बंडखोरीमुळे महायुतीसमोर नवे आव्हान
- * राज्यातील इतर मतदारसंघांतील लढतींवरही परिणाम होण्याची शक्यता



### महाजनांना धक्का की रणनीती?

उमेदवारीची घोषणा थेट दिल्लीहून झाल्याने मंत्री गिरीश महाजन यांची भूमिका चर्चेचा विषय ठरली आहे. उमेदवार निवडीच्या प्रक्रियेत त्यांना विश्वासात घेण्यात आले नव्हते की हा सर्व निर्णय त्यांच्या संमतीनेच झाला, यावर राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू आहे. काही जाणकारांच्या मते, हा निर्णय गिरीश महाजन यांच्यासाठी धक्का मानला जात असला तरी त्यांच्या समर्थकांचे म्हणणे वेगळे आहे. महाजन यांच्या संमतीशिवाय जळगावसारख्या महत्त्वाच्या मतदारसंघात उमेदवार निश्चित होणे शक्य नसल्याचा दावा त्यांच्याकडून केला जात आहे. दरम्यान, शिवसेनेची नाराजी आणि भाजपमधील अंतर्गत अस्वस्थता यामुळे जळगाव विधान परिषद निवडणूक १५ वर्षांनंतर प्रथमच अत्यंत रंगतदार व चर्चेची ठरत आहे. येत्या काळात महायुतीतील नाराज गटांची भूमिका काय राहते आणि त्याचा मतदानाच्या समीकरणांवर किती परिणाम होतो, याकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

✓ » Selected

### कोयंबतूर-जयपूर विशेष एक्स्प्रेसला थांबा

धरणगाव | धरणगावसह परिसरातील रेल्वे प्रवाशांसाठी आनंदाची बातमी असून पश्चिम रेल्वे प्रशासनाने ०६१८१/०६१८२ कोयंबतूर-जयपूर विशेष एक्स्प्रेसला धरणगाव रेल्वे स्थानकावर अधिकृत थांबा मंजूर केला आहे. या निर्णयामुळे राजस्थान आणि दक्षिण भारताकडे प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांची अनेक वर्षांची मागणी अखेर पूर्ण झाली असून नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. धरणगाव तालुक्यातील व्यापारी, विद्यार्थी, नोकरदार वर्ग तसेच राजस्थानशी व्यावसायिक संबंध असलेले नागरिक मोठ्या प्रमाणावर रेल्वे प्रवास करतात. मात्र, कोयंबतूर-जयपूर विशेष एक्स्प्रेसला धरणगाव येथे थांबा नसल्याने प्रवाशांना जळगावसह इतर स्थानकांवर जाऊन गाडी पकडावी लागत होती. त्यामुळे वेळेचा अपव्यय आणि अतिरिक्त आर्थिक खर्चाचा सामना करावा लागत होता.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## जळगाव विधान परिषदेत महायुतीसमोर बंडखोरीचे आव्हान

### नगरसेविका रेश्मा काळे अपक्ष

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत महायुतीसमोर आता घरातूनच बंडखोरीचे आव्हान उभे ठाकले आहे. महायुतीकडून भाजपचे नंदकिशोर महाजन यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर नाराज झालेल्या शिवसेना (शिंदे गट) पदाधिकाऱ्यांनी बंडाचे निशाण फडकावले आहे. शिवसेनेच्या नगरसेविका रेश्मा कुंदन काळे आणि पदाधिकारी दीपक धांडे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याने जळगावच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. महायुतीत जळगाव विधान परिषद मतदारसंघाची जागा शिवसेनेला मिळेल, अशी अपेक्षा स्थानिक शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांमध्ये होती. मात्र जागावाटपात ही जागा भाजपच्या वाट्याला गेल्यानंतर शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये नाराजीची भावना निर्माण झाली. उमेदवारीबाबत स्थानिक पातळीवरील अपेक्षा धुळीस मिळाल्याने अखेर या नाराजीचे रूप बंडखोरीत बदलल्याचे चित्र दिसत आहे. रेश्मा काळे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करत थेट महायुतीच्या अधिकृत उमेदवारासमोर आव्हान उभे केले आहे.



त्यांच्या उमेदवारीमुळे निवडणुकीचे राजकीय गणित गुंतागुंतीचे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### महिलांनाही राजकारणात समान संधी मिळावी

महिलांना संधी मिळावी म्हणून निवडणूक रिंगणात उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर रेश्मा काळे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. "या मतदारसंघातून आजपर्यंत महिलेला संधी देण्यात आलेली नाही. महिलांचे प्रतिनिधित्व वाढावे आणि महिलांनाही राजकारणात समान संधी मिळावी, या भूमिकेतून मी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे," असे त्यांनी सांगितले. कार्यकर्ते स्थानिक नेतृत्वाला डावलण्यात आल्याची भावना व्यक्त करत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

## उपवर्गीकरणाविरोधातील बीड-ते-मुंबई लॉग मार्च यशस्वी करण्यासाठी मुंबईत नियोजन बैठक

### २६ जूनला मुंबईत होणार मार्चचे स्वागत; विविध समित्यांची स्थापना, संघटनांना सहभागी होण्याचे आवाहन

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** अनुसूचित जातींमधील उपवर्गीकरणाच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात १० जूनपासून बीड ते मुंबई असा काढण्यात येणारा लॉग मार्च यशस्वी करण्यासाठी मुंबईतील घाटकोपर येथील रमाबाई कॉलनीतील शहीद स्मारक येथे विविध सामाजिक, राजकीय आणि आंबेडकरी संघटनांची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत मार्चच्या नियोजनासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच विविध समित्यांची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्य सरकारने अनुसूचित जातींमध्ये 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' असे उपवर्गीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या माजी न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल अद्याप जाहीर करण्यात आलेला नसताना समितीकडून जनतेच्या हरकती आणि सूचना मागविण्यात आल्याने राज्यातील ५६ अनुसूचित जातींमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयाच्या विरोधात सर्वपक्षीय आणि विविध सामाजिक संघटनांच्या वतीने मागील आठवड्यात छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या बैठकीत बीड ते मुंबई (आझाद मैदान) असा लॉग मार्च काढण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार १० जून रोजी बीड येथून निघणारा हा मार्च २६ जून रोजी मुंबईत दाखल होणार आहे. मुंबईतील बैठकीत मार्चच्या यशस्वी आयोजनासाठी नियोजन समिती, स्वयंसेवक समिती, शासकीय कार्य समिती, सोशल मीडिया समिती, मीडिया समिती आणि समन्वय समिती आदी विविध समित्या स्थापन करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच मुंबईतील सर्व अनुसूचित जातींच्या संस्था व संघटनांशी संपर्क साधून त्यांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्याचेही ठरविण्यात आले. मुंबईतील विविध वस्त्या, परिसर आणि सामाजिक केंद्रांमध्ये जाऊन जनजागृती बैठका आयोजित करण्याचे नियोजन यावेळी करण्यात आले.



## मराठा आंदोलनातील मृतांच्या वारसांना MIDC मध्ये नोकरी

### उपोषणानंतर हालचालींना वेग; पात्र वारसांच्या पडताळणीचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई । प्रतिनिधी :** मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या आंदोलकांच्या कुटुंबियांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. आंदोलनातील मृतांच्या पात्र वारसांना आता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) मध्ये अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला असून यासंदर्भातील शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाकडून जारी करण्यात आला आहे. या निर्णयानुसार मराठा आरक्षण आंदोलनात मृत्यू झालेल्या आंदोलकांच्या वारसांची पडताळणी करण्याचे आदेश राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. पात्र वारसांची खातरजमा करून त्यांना अधिकृत प्रमाणपत्र देण्यात येणार असून, त्या प्रमाणपत्राच्या आधारे MIDC मध्ये नोकरीची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी काही दिवसांपूर्वी उपोषण सुरू केले होते. या आंदोलनादरम्यान त्यांनी आरक्षणाच्या लढ्यात मृत्यू झालेल्या आंदोलकांच्या कुटुंबियांना न्याय देण्याची मागणी केली होती. विशेषतः मृतांच्या वारसांना MIDC मध्ये नोकरी देण्याचा मुद्दा त्यांनी ठामपणे मांडला होता. सरकारसोबत झालेल्या चर्चेनंतर त्यांच्या काही प्रमुख मागण्या मान्य करण्यात आल्या आणि त्यानंतर त्यांनी उपोषण मागे घेतले. मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या मागणीसंदर्भात सकारात्मक भूमिका घेत आश्वासन दिले होते. त्यानंतर प्रशासनाने तातडीने हालचाली करत शासन निर्णय जारी केल्याचे सांगितले जात आहे. मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान अनेक आंदोलकांनी जीव गमावला होता. त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक आणि सामाजिक आधार देण्यासाठी सरकारकडून यापूर्वी विविध मदतीच्या घोषणा करण्यात आल्या होत्या. आता MIDC मध्ये नोकरीची संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय हा त्या कुटुंबांसाठी मोठा दिलासा मानला जात आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे आंदोलनातील मृतांच्या वारसांना स्थैर्य मिळण्यास मदत होणार असून रोजगाराच्या माध्यमातून त्यांना आधार मिळेल, अशी भावना मराठा समाजातून व्यक्त होत आहे.



## राज्यावर अवकाळी संकट! पुढील 24 तास धोक्याचे!

### वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाचा इशारा

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई| प्रतिनिधी :** राज्यातील हवामानात पुन्हा एकदा मोठा बदल होत असून भारतीय हवामान विभागाने (IMD) पुढील 24 तासांसाठी गंभीर इशारा जारी केला आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यांसह जोरदार पाऊस, विजांचा कडकडाट आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. IMD ने धुळे, नंदुरबार, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना, चंद्रपूर आणि गोंदिया या जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला असून 50 ते 60 किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवली आहे. तर राज्यातील 23 जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यात उष्णतेची तीव्रता कमी झाली असली तरी अवकाळी पावसाचे प्रमाण वाढले आहे. परभणी, धाराशिव आणि धुळे येथे 41 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असतानाच अनेक भागांत ढगाळ वातावरण आणि पावसाची हजेरी सुरू झाली आहे. नांदेडमध्ये वीज पडून जनावरांचा मृत्यू नांदेड जिल्ह्यात सायंकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यांसह जोरदार पाऊस झाला. उमरी तालुक्यातील बोळसा येथे वीज कोसळून आठ शेळ्या आणि एक गाय दगावल्याची घटना घडली. अचानक आलेल्या वादळी पावसामुळे शेतकरी आणि पशुपालकांचे मोठे नुकसान झाले आहे. जळगावात अर्धा तास मुसळधार पाऊस जळगाव शहरात सायंकाळच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार मान्सूनपूर्व पाऊस झाला. विजांच्या कडकडाटासह तब्बल अर्धा तास मुसळधार पाऊस सुरू होता.



अचानक कोसळलेल्या पावसामुळे घरी परतणाऱ्या नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. दिवसभर ढगाळ वातावरणानंतर आलेल्या या पावसाने उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला. परभणीत घरांचे नुकसान, रेल्वे वाहतूक विस्कळीत परभणी जिल्ह्यातही अनेक भागांत वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. पोखर्णी परिसरात घरांवरील पत्रे उडून गेली, तर रेल्वे स्थानकावरील पत्रे उडाल्याने विद्युत तार तुटून रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला. गंगाखेड तालुक्यात वीज पडून दोन जनावरे दगावल्याची माहिती समोर आली आहे.

### शेतकऱ्यांची चिंता वाढली

राज्यात मान्सूनपूर्व पावसाचे प्रमाण वाढल्याने शेतकरी चिंतेत आहेत. गारपीट आणि वादळी वाऱ्यांमुळे फळबागा, भाजीपाला तसेच काढणीस आलेल्या पिकांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यापूर्वीही मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील काही भागांत गारपिटीमुळे मोठे नुकसान झाले होते.
नागरिकांसाठी सूचना
वादळी हवामानात सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा.
झाडाखाली किंवा उघड्या जागेत थांबू नये.
शेतकऱ्यांनी जनावरे सुरक्षित ठिकाणी हलवावीत.
हवामान खात्याच्या सूचनांचे पालन करावे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

## म्हाडा इमारतीत महिलेला डांबून ठेवल्याचा आरोप

### संतप्त नागरिकांचा पोलीस ठाण्यावर मोर्चा; महत्त्वाचे फोटो-व्हिडिओ पोलिसांच्या ताब्यात

**जन सम्राट टाईम्स**

**धुळे| प्रतिनिधी :** चाळीसगाव रोड परिसरातील म्हाडाच्या इमारतीत एका महिलेला अनेक दिवसांपासून बेकायदेशीररीत्या डांबून ठेवल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेविरोधात संतप्त झालेल्या मिरजकर नगर परिसरातील शेकडो नागरिकांनी स्थानिक नगरसेवक व सामाजिक कार्यकर्त्यांसह चाळीसगाव रोड पोलीस ठाणे गाठत संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, म्हाडा इमारतीतील चौथ्या मजल्यावरील एका सदनिकेत संबंधित महिला राहत होती. काही दिवसांपासून ती मदतीसाठी हाका मारत असल्याची माहिती नागरिकांनी दिली. या प्रकाराची माहिती पोलिसांना देण्यात आली होती. मात्र, तत्काळ कारवाई होत नसल्याची भावना व्यक्त करत नागरिकांनी पोलीस ठाण्यासमोर तीव्र नाराजी व्यक्त केली. या प्रकरणात नागरिकांनी काही महत्त्वाचे फोटो आणि व्हिडिओ पोलिसांच्या ताब्यात दिले असून त्यामुळे तपासाला अधिक गती मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी प्राप्त माहिती आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे तपास सुरू केला आहे.

महिलेला खरोखरच बेकायदेशीररीत्या डांबून ठेवण्यात आले होते का, ती तेथे स्वतःच्या इच्छेने राहत होती का, तिच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव किंवा अत्याचार झाला होता का, तसेच या प्रकरणामागे अन्य काही कारणे अथवा कटकारस्थान आहे का, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विविध अंगांनी तपास सुरू केला आहे. याशिवाय इमारतीतील सीसीटीव्ही फुटेजची तपासणीही करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे. घटनेची गंभीरता लक्षात घेता रात्री उशिरापर्यंत तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया सुरू होती. पोलिसांनी कोणताही निष्कर्ष न काढता सर्व बाजूंची पडताळणी करून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. दरम्यान, या प्रकरणामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. पोलिसांच्या तपासानंतरच घटनेमागील सत्य परिस्थिती स्पष्ट होणार आहे. यावेळी भाजपा नगरसेवक धीरज परदेशी, सामाजिक कार्यकर्त्या प्रभा परदेशी, प्रशांत माने, मिलिंद चौधरी, रविंद्र बोरसे, वैभव खोपडे, श्याम चौगुले, जिग्नेश फुलदेवरे, भूषण खैरनार, सागर पाटील, पंकज मराठे, चेतन शेळके, राकेश एरडावकर, संतोष बारी, आकाश बारी, चेतन धुळेकर, तेजस फुलदेवरे, नितीन चौधरी, विशाल मोरे, बेबीबाई माने, ज्योती फुलदेवरे, संगीता बारी, छाया पाटील यांच्यासह शेकडो नागरिक उपस्थित होते.



### पोलिसांसमोर अनेक प्रश्न

**महिला तेथे स्वतःच्या इच्छेने राहत होती की तिला बळजबरीने ठेवण्यात आले होते?**
**तिने मदतीसाठी नागरिकांशी संपर्क साधला होता का?**
**सीसीटीव्ही फुटेजमधून नेमके काय समोर येते?**
**महिलेवर कोणत्याही प्रकारचा अत्याचार किंवा दबाव टाकण्यात आला होता का?**
**या प्रकरणामागे अन्य कोणते कारण अथवा कटकारस्थान आहे का?**
**या सर्व प्रश्नांची उत्तरे पोलीस तपासानंतरच स्पष्ट होणार आहेत.**

# इंधन बचतीचा अनोखा 'धुळे पॅटर्न'; धुळे देशभरात ठरणार आदर्श!

## धुळ्यातील भाजपचे ६० नगरसेवक झाले ई-बाईकस्वार

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी:** गतिक स्तरावर निर्माण झालेल्या इंधन संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या इंधन बचत व आर्थिक स्वावलंबनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत धुळे महापालिकेतील भारतीय जनता पक्षाच्या ६० नगरसेवकांनी स्वखर्चाने इलेक्ट्रिक बाईक (ई-बाईक) खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. हा अभिनव उपक्रम देशातील लोकप्रतिनिधींसाठी प्रेरणादायी ठरेल आणि इंधन बचतीचा 'धुळे पॅटर्न' देशभरात कौतुकास्पद ठरेल, असा विश्वास आमदार अनुपभय्या अग्रवाल यांनी व्यक्त केला. पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे इंधन पुरवठा साखळीवर ताण निर्माण झाला असून देशाच्या परकीय चलन साठ्यावरही परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना काटकसर, ऊर्जा बचत आणि आर्थिक स्वावलंबनासाठी सात महत्त्वाची आवाहने केली होती. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत आमदार अनुपभय्या अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली भाजपच्या नगरसेवकांनी इंधन बचतीसाठी इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार शनिवारी सायंकाळी चेतक कंपनीच्या शोरूममध्ये जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे आणि आमदार अनुपभय्या अग्रवाल यांच्या उपस्थितीत ई-बाईक वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्स्ना पाटील, स्थायी समिती सभापती लताबाई सोनार, गटनेत्या किरण कुलेवार, महिला व बालकल्याण समिती सभापती उज्वला ठाकरे यांच्यासह सर्व महिला-पुरुष नगरसेवक आणि भाजप पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. इंधन बचतीला लोकप्रतिनिधींचा अनोखा प्रतिसाद : जयकुमार रावल पालकमंत्री जयकुमार रावल म्हणाले, "आमदार अनुपभय्या अग्रवाल आणि त्यांच्या सहकारी नगरसेवकांनी इलेक्ट्रिक बाईकचा स्वीकार करून इंधन बचतीसाठी घेतलेला निर्णय अत्यंत कौतुकास्पद आहे.

### नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला दिलेला हा सकारात्मक प्रतिसाद देशभरातील लोकप्रतिनिधींसाठी अनुकरणीय ठरेल. संकटकाळात जबाबदार जीवनशैली स्वीकारण्याचा आदर्श भाजपच्या लोकप्रतिनिधींनी घालून दिला आहे." 'विरोधकांच्या डोक्यातच कचरा' : आमदार अग्रवाल कार्यक्रमानंतर बोलताना आमदार अनुपभय्या अग्रवाल यांनी विरोधकांच्या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, "भाजपचे ६० नगरसेवक स्वखर्चाने इलेक्ट्रिक बाईक खरेदी करत असल्याचे पाहून विरोधकांना पोटशूळ उठला आहे. कचरा ठेकेदाराने या बाईक दिल्याचा आरोप पूर्णपणे निराधार आहे. सर्व नगरसेवकांनी स्वतःच्या पैशातून, तर काहींनी कर्ज काढून या बाईक खरेदी केल्या आहेत.

जन सम्राट टाईम्स विशेष बातमी

# राजमाता अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

## सामाजिक बांधिलकी जपत युवकांचा उत्स्फूर्त सहभाग

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी :** पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. समाजोपयोगी उपक्रम म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात युवकांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग नोंदवून रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित केले.

या रक्तदान शिबिराचे आयोजन आम आदमी पार्टीचे अध्यक्ष महेंद्र नाना साळुंखे व उपाध्यक्ष रामकृष्ण चिंतामण पाटील यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेत रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. कार्यक्रमास खासदार स्मिता वाघ, नगरसेवक मोहन बालाजी सातपुते, शिवसेना शहरप्रमुख नितीन नळे, डॉ. अनिल शिंदे, भैरवी पलांडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तसेच एस.टी. महामंडळातील कर्मचाऱ्यांनीही शिबिरात सहभाग नोंदवून उपक्रमाला पाठिंबा दिला.

यावेळी अनेक युवकांनी रक्तदान करत समाजसेवेचा संदेश दिला. विशेषतः सामाजिक कार्यात सक्रिय असलेले युवा कार्यकर्ते ललित भाऊ सातपुते यांनी रक्तदान करून इतर युवकांसमोर आदर्श निर्माण केला.

रक्तदान हे सर्वोत्तम दान मानले जाते. अशा उपक्रमांमुळे गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होते, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित हा उपक्रम समाजसेवा आणि मानवतेचा संदेश देणारा ठरला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# अहिल्यादेवी होळकरांना धनगर समाजाचे अभिवादन

## विचारांचा वारसा जपत समाजसेवेचा संकल्प



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव । प्रतिनिधी :** राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त येथील धनगर समाजातर्फे त्यांच्या स्मारकाजवळ प्रतिमापूजन व माल्यार्पणाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. समाजाचे अध्यक्ष शरद कंखरे, उपाध्यक्ष राजू न्हायदे तसेच पंचमंडळाच्या सदस्यांनी अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करून कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले. या कार्यक्रमास हिलाल बच्छाव, गणेश देवरे, हिरामण देवरे, रमण सोनवणे, सम्राट सोनवणे, समाधान न्हायदे, गोविंद मनोरे, गुलाब न्हायदे, हरचंद रत्नपारखी, अर्जुन सोनवणे, राजेंद्र बिऱ्हाडे, भैय्या धनगर यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नगरसेवक भूषण कंखरे यांनी मनोगत व्यक्त करताना राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, अहिल्यादेवी या न्यायप्रिय, दूरदर्शी आणि लोककल्याणकारी शासक होत्या. त्यांच्या राज्यकारभाराचा केंद्रबिंदू सत्ता नसून जनकल्याण होता. प्रजेच्या सुख-समृद्धीसाठी त्यांनी संपूर्ण आयुष्य समर्पित केले. देशभरात घाट, मंदिरे, धर्मशाळा, विहिरी, तलाव आणि रस्त्यांची उभारणी करून अहिल्यादेवींनी राष्ट्रनिर्माणात मोलाचे योगदान दिले. काशी विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार, सोमनाथ मंदिराचे पुनर्बांधकाम तसेच अनेक तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. महिला सक्षमीकरण, न्यायव्यवस्था, सर्वधर्मसमभाव आणि लोकाभिमुख प्रशासन या क्षेत्रांत अहिल्यादेवींनी घालून दिलेले आदर्श आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक ठरत आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा जपत समाजहित आणि लोककल्याणासाठी कार्य करण्याचा संकल्प उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला.

### नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित

या कार्यक्रमास हिलाल बच्छाव, गणेश देवरे, हिरामण देवरे, रमण सोनवणे, सम्राट सोनवणे, समाधान न्हायदे, गोविंद मनोरे, गुलाब न्हायदे, हरचंद रत्नपारखी, अर्जुन सोनवणे, राजेंद्र बिऱ्हाडे, भैय्या धनगर यांच्यासह विविध सामाजिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भूषण कंखरे यांनी मनोगत व्यक्त करताना राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला.

# धुळ्यात धाडसी घरफोडी; 45 तोळे सोन्यासह हजारोंची रोकड लंपास

## घर बंद असल्याची संधी साधत मध्यरात्री चोरट्यांचा डल्ला; फॉरेन्सिक पथकासह पोलिसांचा तपास सुरू

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी :** शहरासह जिल्ह्यात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असताना साक्री रोड परिसरातील अरुणकुमार वैद्य नगर येथे एका बंगल्यात धाडसी घरफोडीची घटना घडली. चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करत सुमारे 45 तोळे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने आणि 27 हजार रुपयांची रोकड लंपास केली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, किराणा व्यावसायिक मोहनलाल हरवाणी यांच्या मालकीच्या प्लॉट क्रमांक 15 वरील बंगल्यात ही चोरी झाली. बंगल्याचे नूतनीकरण सुरू असल्याने हरवाणी कुटुंब सध्या अन्यत्र वास्तव्यास आहे. दररोज कुटुंबातील एक सदस्य रात्रीच्या वेळी त्या घरात मुक्काम करत होता. मात्र, हरवाणी यांचा मुलगा पत्नीला आणण्यासाठी भोपाळ येथे गेल्याने गेल्या दोन दिवसांपासून घर पूर्णपणे बंद होते. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी घरफोडी केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. सकाळी हरवाणी यांच्या पत्नी घराकडे आल्या असता मुख्य दरवाजा उघडा असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घरात प्रवेश केल्यानंतर कपाटे फोडून त्यातील सोन्या-चांदीचे दागिने आणि रोकड चोरीला गेल्याचे आढळून आले. त्यानंतर तातडीने पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी फॉरेन्सिक पथकासह घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असून संशयितांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कामाला लागली आहेत. शहर आणि जिल्ह्यात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून चोरट्यांवर आळा घालण्याचे मोठे आव्हान पोलीस प्रशासनासमोर उभे राहिले आहे. या प्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सुरू आहे.

# 'एकाचे तीन लाख' देण्याचे आमिष; दरोडा टाकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## मध्यप्रदेशातील शिक्षकाला खोरी येथे बोलावून मारहाण; 1.14 लाखांचा ऐवज लुटला

जन सम्राट टाईम्स



**धुळे । प्रतिनिधी :** "एक लाख रुपयांचे तीन लाख करून देतो" असे आमिष दाखवत मध्यप्रदेशातील एका शिक्षकाला धुळे जिल्ह्यात बोलावून त्याच्यावर दरोडा टाकणाऱ्या टोळीतील तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या आठ तासांत निष्पन्न केले आहे. यापैकी एका आरोपीला ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी निजामपूर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 30 मे रोजी दुपारी खोरी (निजामपूर), ता. साक्री येथील पवनचक्की टॉवरजवळ अनिल उमरावसिंह बोडाणा (वय 35), व्यवसाय शिक्षक, रा. रुपाखेडी, ता. तराणा, जि. उज्जैन (मध्यप्रदेश) यांच्यासह त्यांच्या मित्रास 12 ते 14 जणांच्या टोळीने घेरले. चाकूचा धाक दाखवत आरोपींनी त्यांच्याकडून मोबाईलवरील फोन-पे ॲपद्वारे जबरदस्तीने पैसे ट्रान्सफर करून घेतले. तसेच रोख रक्कम, चांदीची चैन, चार्जर असा एकूण 1 लाख 14 हजार 200 रुपयांचा ऐवज हिसकावून घेत मारहाण केली. या प्रकरणी निजामपूर पोलीस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याने पोलिसांना सांगितले की, त्याचा मित्र बाबुशेठ ऊर्फ राकेश सज्जनसिंग भोसले (रा. जामदे) याने इन्स्टाग्रामवर "एक लाखाचे तीन लाख करून देतो" अशा आशयाचे रिल्स अपलोड केले होते. या रिल्सला भुलून फिर्यादी अनिल बोडाणा यांनी आरोपींशी संपर्क साधला. त्यानंतर त्यांना धुळे जिल्ह्यातील निजामपूर येथे बोलावण्यात आले. तेथे आल्यानंतर आरोपींनी त्यांना वाहनातून खोरी येथे नेले. पवनचक्की टॉवरजवळ आधीपासून दबा धरून बसलेल्या 12 ते 14 जणांनी त्यांच्यावर हल्ला चढविला. फोन-पेद्वारे 1.06 लाखांची जबरदस्तीने वसुली आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या मित्राला मारहाण करून मोबाईल हिसकावून घेतला. चाकूचा धाक दाखवत फोन-पेद्वारे आरोपी मंगेश कढरेच्या खात्यावर दोन व्यवहारांमधून एकूण 1 लाख 6 हजार रुपये ट्रान्सफर करण्यास भाग पाडले.गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांनी तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे तपास पथक तयार केले. सहाय्यक पोलीस निरीक्षक नामदेव सहारे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने अवघ्या आठ तासांत आरोपी मंगेश कढरे याला भामेर येथून ताब्यात घेत गुन्ह्याचा उलगडा केला.

तपासात बाबुशेठ ऊर्फ राकेश भोसले व मुकेश प्रकाश भामरे यांच्यासह इतर 12 ते 13 जणांचा सहभाग निष्पन्न झाला असून सर्व आरोपींचा शोध सुरू आहे. अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक नामदेव सहारे तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली.

### आमिषांना बळी पडू नका

सावधान! सोशल मीडियावरील 'दुप्पट-तिप्पट पैसे मिळवा' अशा आमिषांना बळी पडू नका. अशा प्रकारच्या फसवणुकीतून आर्थिक नुकसानासह गंभीर गुन्ह्यांचे बळी ठरण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# बुद्धमूर्ती तोडफोड प्रकरणी संतापाचा उद्रेक

## गुन्हा दाखल करण्यासाठी आंदोलन



जन सम्राट टाईम्स

**कल्याण | प्रतिनिधी :** वालधुनी परिसरात महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या कारवाईदरम्यान भगवान बुद्ध यांच्या मूर्तीची तसेच भीमा कोरेगाव विजयस्तंभाची तोडफोड झाल्याचा आरोप करत बौद्ध समाज आणि भीम अनुयायांनी तीव्र संताप व्यक्त केला. दोषींवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी महात्मा फुले पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. बुद्धभूमी फाउंडेशनचे बौद्ध धम्मगुरू गौतमरत्न महाथेरो यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने भीम अनुयायी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान "बुद्धमूर्तीची तोडफोड सहन केली जाणार नाही" आणि "दोषींना तात्काळ अटक करा" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

आंदोलनकर्त्यांच्या आरोपानुसार, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकडून करण्यात आलेल्या कारवाईत बुद्धमूर्ती, भीमा कोरेगाव विजयस्तंभ आणि परिसरातील शेकडो वृक्षांचे नुकसान झाले. विशेष म्हणजे ही कारवाई पोलिसांच्या उपस्थितीत झाल्याचा आरोपही आंदोलकांनी केला आहे. सामाजिक भावना दुखावणारा गंभीर प्रकार असल्याचे त्यांनी म्हटले. दोषींवर कठोर कारवाईची मागणी या प्रकरणातील संबंधित अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार आणि जबाबदार व्यक्तींवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. यासंदर्भात सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक होनमाने तसेच महात्मा फुले पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक परदेशी यांना निवेदनही देण्यात आले. काँग्रेसचा जाहीर पाठिंबा या आंदोलनाला काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ पातकर यांनी जाहीर पाठिंबा दिला. त्यांनी आंदोलनात प्रत्यक्ष सहभागी होत प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली. तसेच न्याय मिळाला नाही तर राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. गुन्हा दाखल न झाल्याने ठिय्या आंदोलन पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करण्यास नकार दिल्याचा आरोप करत आंदोलनकर्त्यांनी पोलीस ठाण्यासमोरच ठिय्या आंदोलन सुरू केले. यावेळी जोरदार घोषणाबाजी करत त्यांनी पोलीस प्रशासनाचा निषेध नोंदविला. दरम्यान, बुद्धमूर्ती आणि भीमा कोरेगाव विजयस्तंभाच्या कथित तोडफोडीप्रकरणी सखोल चौकशी करून दोषींवर ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.

### "बुद्धमूर्तीची तोडफोड सहन केली जाणार नाही

दोषींवर अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी महात्मा फुले पोलीस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. बुद्धभूमी फाउंडेशनचे बौद्ध धम्मगुरू गौतमरत्न महाथेरो यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने भीम अनुयायी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान "बुद्धमूर्तीची तोडफोड सहन केली जाणार नाही" आणि "दोषींना तात्काळ अटक करा" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# माउंट आबू येथे 'मूल्य आधारित न्याय' विषयावरील अखिल भारतीय परिषद संपन्न

## तंत्रज्ञान आणि मानवी मूल्यांचा संगम; धरणगावच्या विधिज्ञांची उल्लेखनीय उपस्थिती

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव । प्रतिनिधी:** राजस्थातनमधील निसर्गरम्य व आध्यात्मिक वातावरणासाठी प्रसिद्ध असलेल्या माउंट आबू येथे प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयातर्फे 'मूल्य आधारित न्याय' या विषयावर चार दिवसीय अखिल भारतीय परिषद व चिंतन शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. देशभरातील न्यायाधीश, विधिज्ञ, कायदेतज्ज्ञ आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या परिषदेत न्यायव्यवस्थेतील मानवी मूल्ये, नीतिमत्ता, पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. या प्रतिष्ठित परिषदेत धरणगाव येथील कायदा व न्यायव्यवस्थेच्या क्षेत्रातील नामांकित वकिलांच्या शिष्टमंडळाने सक्रिय सहभाग नोंदविला. न्यायव्यवस्था अधिक संवेदनशील, मूल्याधिष्ठित आणि लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने आयोजित या परिषदेत विविध राज्यांतील न्यायाधीश, विधिज्ञ तसेच ब्रह्मकुमारी संस्थेचे वरिष्ठ मार्गदर्शक उपस्थित होते. परिषदेस मध्यप्रदेश उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती गुरु पाल सिंग अहलुवालिया, जालोर ग्राहक न्यायालयाचे न्यायाधीश एस. यादव तसेच बेळगावचे जिल्हा न्यायाधीश यांची विशेष उपस्थिती




लाभली. यावेळी सुप्रसिद्ध प्रेरणादायी वक्त्या बी.के. शिवानी यांनी मूल्याधिष्ठित जीवनशैली, सकारात्मक विचारसरणी आणि न्यायव्यवस्थेतील नैतिकतेचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. न्यायमूर्ती गुरु पाल सिंग अहलुवालिया यांनी न्यायप्रक्रिया अधिक गतिमान आणि प्रभावी करण्यासाठी खालच्या न्यायालयांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा व्यापक वापर करण्याची गरज व्यक्त केली. न्यायालयीन कामकाजातील डिजिटल परिवर्तनामुळे नागरिकांना जलद व सुलभ न्याय मिळण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. न्यायाधीश एस. यादव यांनी ग्राहक न्यायालयांमध्ये वाढत असलेल्या दाव्यांच्या पार्श्वभूमीवर ग्राहक हक्कांचे संरक्षण, तक्रारींचे त्वरित निवारण आणि प्रभावी उपाययोजनांची आवश्यकता अधोरेखित केली. तर बेळगाव जिल्हा न्यायाधीशांनी प्रलंबित प्रकरणांच्या जलद निपटाऱ्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देत न्यायव्यवस्थेतील कार्यक्षमतेवर भर दिला. परिषदेदरम्यान न्यायव्यवस्थेतील मानवी मूल्यांचे संवर्धन, न्यायदान प्रक्रियेतील पारदर्शकता, नैतिकता आणि समाजहित यांसंदर्भातील चिंतनपर सत्रांचे आयोजन करण्यात आले. विविध राज्यांतील न्यायिक अधिकारी आणि विधिज्ञांनी आपले अनुभव मांडत न्यायव्यवस्था अधिक लोकाभिमुख करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर विचारमंथन केले.

### हा संवाद सर्व उपस्थितांसाठी प्रेरणादायी

चार दिवसीय चिंतन शिबिरातून न्यायव्यवस्थेत मानवी मूल्ये आणि नीतिमत्तेची जोपासना करण्याचा संकल्प अधिक दृढ झाला. न्याय, सेवा, करुणा आणि नैतिकता यांचा समतोल साधणारी न्यायव्यवस्था उभारण्याच्या दिशेने ही परिषद महत्त्वपूर्ण ठरली. न्यायिक बंधुभाव, वैचारिक देवाणघेवाण आणि मूल्याधिष्ठित न्यायव्यवस्थेचा संदेश देणारा हा संवाद सर्व उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.